QUICK NEWS

सपा आमदार निलंबित

वृत्तसंस्था

लखनौ. सपा अध्यक्ष अखिलेश यादव यांच्या आदेशावरून फिरोजाबाद जिल्ह्याचे सिरसागंज मतदारसंघाचे आमदार हरिओम सिंह यादव यांना पक्षविरोधी कार्य करण्याच्या आरोपात 6 वर्षांसाठी पक्षातून निलंबित करण्यात आले आहे. सपाच्या मुख्यालयातून जारी करण्यात आलेल्या निवदेनात ही माहिती देण्यात आली. गेल्यावर्षी नोव्हेंबरमध्ये झालेल्या पोटनिवडणुकीदरम्यान टूंडला जागेवरून सपा उमेदवाराच्या पराजयानंतर हरिओम सिंह यादव यांनी अखिलेश यादवसहित पक्षाच्या नेत्यांविरोधात वक्तव्य केले होते.

टर्कीची अशांतता पसरविण्याची तयारी

नवराष्ट्र न्यूज नेटवर्क

दिल्ली. काश्मीरसंदर्भात दिवसोंदिवस पाकिस्तान आणि टर्की या दोन देशांचे संबंध अधिक दृढ होताना दिसत आहे. असे असतानाच या दोन्ही देशांच्या दरम्यान काश्मीरसंदर्भात एक योजना आखली जात असल्याचा दावा ग्रीसमधील काही प्रसारमाध्यमांनी केला आहे. पाकिस्तानला काश्मीर विषयावर मदत करण्यासाठी टर्कीचे राष्ट्राध्यक्ष रिसीप तयिप एर्दोगन यांनी दहशतवाद्यांची एक तुकडी पाठविण्याची तयारी सुरू केल्याचे वृत्त आहे. काश्मीरमध्ये अशांतता निर्माण करण्यासाठी दृष्टीने ही तुकडी पाकिस्तानच्या मदतीसाठी टर्कीकडून पाठवली जाण्याची शक्यता आहे.

चिनी दूतावासासमोर नागरिकांचे आंदोलन

वृत्तसंस्था

दिल्ली. म्यानमारमध्ये लष्कराने फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात केलेल्या बंडाला विरोध दर्शविण्यासाठी हजारो लोक रस्त्यावर उतरत असल्याचे चित्र दिसत आहे. मागील आठवडाभरपासून सुरू असणाऱ्या आंदोलनामध्ये मोठ्या संख्येने नागरिक रस्त्यावर उतरल्याचे पहायला मिळत आहे. काही ठिकाणी तर म्यानमारमधील नागरिकांनी थेट चीनविरोधात मोर्चांचे आयोजन केले आहे. चीन हा शांतताप्रिय म्यानमारमध्ये अशांतता पसरविण्याचे काम करत आहे असा आरोप आंदोलकांनी केला आहे. 'लाँग लिव्ह मदर सू' आणि 'लष्करी हुकूमशाहीचा निषेध असो' अशा घोषणा देत हजारो नागरिक लष्करी हुकूमशाह कमांडर-इन चीफ जन. मिन आँग हलेइंगविरोधात घोषणा देत आहे.

ओबामांच्या कॅम्पेन मॅनेजरचा मानला सल्ला

राहुल 'कमबॅक'साठी सज्ज ?

वृत्तसंस्था

दिल्ली. राहुल गांधी पुन्हा एकदा अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या 87 व्या अध्यक्षाच्या रूपात 'कमबॅक' करण्याची तयारी करीत आहे. नुकतेच राहुल यांनी शेतकऱ्यांचे मुद्दे ठामपणे संसदेत मांडण्याचा प्रयत्न केला. याशिवाय त्यांनी चीन व दुसऱ्या मुद्याला सातत्याने लावून धरले. हे सर्व या गोष्टीचे संकेत आहेत की, राहुल गांधी नरेंद्र मोदी यांच्याविरोधात एक लोकप्रिय चेहऱ्याऐवजी ध्रुवीकरण करणाऱ्या नेत्याच्या रूपात समोर येत आहे.

राहुल यांना असे करण्याचा सल्ला 2012 मध्ये प्रतिष्ठित राजकीय सल्लागार स्टेफन कटर यांनी दिला होता. ते बराक ओबामा यांच्या निवडणूक अभियानाचे व्यवस्थापक होते. त्यावेळी त्यांनी काँग्रेसच्या ऑफिसमध्ये राहुल यांची भेट घेतली होती. त्यावेळी केंद्रात युपीए सरकार होते. परंतु राहुल यांनी त्यावेळी त्यांच्या सल्ला गंभीरपणे घेतला नव्हता.

समीकरणे बदलणार

याशिवाय प्रियांका गांधीदेखील पक्षात मोठी भूमिका निभावण्याच्या तयारीत आहेत. राहुल-प्रियांकाची जोडी आता सोनिया-राहुलच्या सत्ता समीकरणांना बदलण्यास सज्ज आहे. ही समीकरणे अहमद पटेल व मोतीलाल वोरा यांनी निश्चित केली होती. राहुल गांधी अध्यक्ष बनल्यानंतर प्रियांका अनेक भूमिका निभावू शकतात. याचच अर्थ प्रियांका गांधी राहुल व पक्षाच्या मध्ये पुलाचे काम करू शकतात. त्या अशा एक व्यवस्थापकाची भूमिका पार पाडू शकतात, जो पक्षाला कठीण काळात मदत करेल म्हणजेच पक्षात त्यांची दुसऱ्या क्रमांकाची भूमिका असेल. काँग्रेसचे अनेक नेत्यांना वाटते की, प्रियांका गांधी 'मिशन उत्तर प्रदेश' अभियानाने त्यांचे महत्त्व वाढविले आहे. दुसरीकडे मीडियाचा एक वर्ग असे मानतो की, प्रियांका गांधी यांनी उत्तर प्रदेशात एक नेता किंवा मुख्यमंत्री पदासाठी उमेदवार बनण्याची कोणतीच महत्त्वाकांक्षा दर्शविली नाही.

...तरच जुने दिवस परत येतील

जर काँग्रेसला उत्तर प्रदेशात यश मिळाले, तर प्रियांका गांधी यांचे श्रेय उत्तर प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रमुख अजय कुमार लल्लू यांना देण्यात येईल. असे करून त्या स्थानिक पातळीवर कसा पाया मजबुत करण्यात येऊ शकतो व त्याचा फायदा मिळू शकतो, हे दाखवू इच्छितात. परंतु प्रियांका गांधींनादेखील माहीत आहे की अजय लल्लूसारखा दुसऱ्या नेता देशाच्या इतर राज्यांमध्ये व जिल्ह्यांमध्ये तयार झाल्याशिवाय काँग्रेसचे जुने चांगले दिवस पुन्हा येऊ शकणार नाही.

5 राज्यांमध्ये हवी चांगली कामगिरी

बंगाल, आसाम, तामिळनाडू, पुदुचेरी व केरळमध्ये विधानसभा निवडणूक झाल्यानंतर एआयसीसी संस्थात्मक निवडणुकांची घोषणा जून किंवा ऑगस्ट 2021 मध्ये पूर्ण होणार आहे. जर काँग्रेस केरळमध्ये चांगली कामगिरी करेल, तामिळनाडू व पुदुचेरीमध्ये आघाडीची सत्ता कायम राहिली, तर राहुल गांधी पुन्हा अध्यक्ष बनण्याच्या मोहिमेला जोर चढू शकतो. परंतु 5 राज्यांमध्ये पराभव झाल्यास काँग्रेसमध्ये बेचैनी वाढू शकते. राहुल अध्यक्ष झाल्यानंतर पक्षामध्ये एक नवा उत्साह निर्माण होईल,अशी आशा व्यक्त करण्यात येत आहे.

उप्रत आणखी एकाचा 'विकास दुबे स्टाईल' एन्काउन्टर

नवराष्ट्र न्यूज नेटवर्क

लखनौ. हत्येचा आरोप असलेल्या आणखी एका आरोपीचा उत्तर प्रदेश पोलिसांकडून एन्काउन्टर करण्यात आला. या आरोपीचे नाव गिरधारी असल्याचे समजते. लखनौच्या पॉश विभूतिखंड भागातील पूर्व ब्लॉक प्रमुख अजित सिंह यांच्या हत्येचा मुख्य आरोप कुख्यात शूटर गिरधारी याच्यावर होता. गिरधारी याला अटक केल्यानंतर त्याला घेऊन पोलिस लखनौच्या खरगापूर भागात दाखल झाले होते. हत्या प्रकरणातील पुरावे गोळा करण्याचे पोलिसांचे काम सुरू होते. या दरम्यान गिरधारी याने पोलिसांची बंदूक हिसकावून घेत पळून जाण्याचा प्रयत्न केला. यानंतर झालेल्या चकमकीत गिरधारी ठार झाला, अशी माहिती पोलिसांनी दिली. उल्लेखनीय म्हणजे, गिरधारी याच्या मृत्यूची कहाणी कानपूरच्या बिकरू हत्याकांड प्रकरणातील प्रमुख आरोपी विकास दुबे एन्काउन्टरच्या कहाणीशी अगदी मिळती-जुळती आहे. पोलिसांची बंदूक घेऊन पळण्याचा प्रयत्न करणाऱ्या विकास दुबेचा एन्काउन्टरमध्ये मृत्यू झाल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गिरधारी याला दिल्ली पोलिसांनी अटक केल्यानंतर त्याला उत्तर प्रदेशात आणण्यात आले होते.

पश्चिम बंगालमध्ये भाजपच येणार

शुभेंदू अधिकारींचा विश्वास

नवराष्ट्र न्यूज नेटवर्क

कोलकाता. पश्चिम बंगालमधील आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण आणखी ढवळून निघताना दिसत आहे. तृणमूल काँग्रेसला सोडचिठ्ठी देऊन भारतीय जनता पक्षात (भाजप) प्रवेश केलेल्या शुभेंदू अधिकारी यांनी पश्चिम बंगालमध्ये भाजपच येणार असल्याचा दावा केला आहे. पश्चिम बंगालमधील जनतेने भाजपला मत देण्यासाठी मन बनविले आहे. या विधानसभा निवडणुकीत भाजपची सत्ता पश्चिम बंगालमध्ये येणार आहे. तृणमूल काँग्रेसने काहीही केले, तरी आता फरक पडणार नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी '2019 मध्ये हाफ, 2021 मध्ये साफ', असा नारा दिला आहे, असेही शुभेंदू अधिकारी यांनी सांगितले. काही वर्षांपूर्वी 'जय बांगला'चा नारा तृणमूल काँग्रेसकडून देण्यात आला होता. तृणमूल काँग्रेस पश्चिम बंगालचा बांगलादेश करू इच्छिते. मात्र, आमचा नारा भारत माता की जय आणि जय श्रीराम असा आहे. या विधानसभा निवडणुकीत केंद्रात आणि पश्चिम बंगालमध्ये भाजपचे डबल इंजिन असलेले सरकार येईल, असा विश्वास अधिकारी यांनी व्यक्त केला आहे.

ममता सुरू करणार 'मां की रसोई'

पुढील काही महिन्यांमध्ये पश्चिम बंगालमध्ये विधानसभेच्या निवडणुका पार पडणार आहेत. या पार्श्वभूमीवर सर्वच पक्षांनी कंबर कसण्यास सुरुवात केली आहे. प्रत्येक पक्ष मतदारांना काही ना काही आश्वासने देण्याचा प्रयत्न करत आहे. अशातच पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी सरकार 'मां की रसोई' ही योजना सुरू केली आहे. यात 5 रुपयांमध्ये गरिबांना पोटभर जेवण देण्यात येणार आहे. काही दिवसांपूर्वी गौतम गंभीर यानंदेखील दिल्लीत जनरसोईची सुरुवात केली होती. या ठिकाणी त्याने आपल्या फाऊंडेशनच्या माध्यमातून गरीबांसाठी एका रुपायात जेवण उपलब्ध करून दिले आहे.

टूलकिट प्रकरण

दिशाच्या अटकेवर विरोधी पक्ष एकजूट

वृत्तसंस्था

दिल्ली. पर्यावरण कार्यकर्ती दिशा रवीच्या अटकेवरून विरोधी पक्षांनी केंद्र सरकारवर निशाणा साधला आहे. प्रियांका गांधी, शशी थरूर, कपिल सिब्बलसहित काँग्रेसच्या अनेक नेत्यांनी याप्रकरणी टीका केली आहे. डीएमके नेते कनिमोई, आम आदमी पक्षाचे अध्यक्ष व दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी हा लोकशाहीवर हल्ला असल्याचे म्हटले आहे. शेतकरी आंदोलनात ही दुसरी वेळ आहे जेव्हा विरोधी पक्षांनी एका सूरात सरकारचा विरोध सुरू केला आहे. विरोधी पक्षाच्या नेत्यांनी दिशा रवीच्या कमी वयाचा तर्क दिला ज्यावर बंगळुरूचे भाजप खासदार यांनी काही दहशतवाद्यांची नावे घेतली व सांगितले की, त्यांचेही वय साधारण एवढेच होते. दिशा रवी यांच्या अटकेचा अनेक गैरसरकारी संघटनांनीही विरोध केला आहे.

कोणकोणत्या पक्षाचा पाठिंबा?

दिशा रवीच्या बाजूने शेतकरी संघटनेची शाखा संयुक्त किसान मोर्चाने (एसकेएम) आवाज उठविला आहे. याशिवाय काँग्रेस, डावे पक्ष, आम आदमी पार्टीसहित अनेक विरोधी पक्षाच्या नेत्यांनी दिशाच्या अटकेला चुकीचे म्हटले आहे. कोअलिशन फॉर एन्वायर्नमेंटल जस्टिस इन इंडियाने देशभरातील 78 कार्यकर्त्यांकडून निवेदन जारी करत दिशाच्या अटकेचा निषेध केला आहे. अनेक सेलिब्रिटिजनेही दिशा रवीच्या समर्थनात ट्विट केले आहे.

भाजपा नेत्याचे ट्विट व्हायरल

भाजपाचे वरिष्ठ नेता आणि बंगळुरू सेंट्रलचे खासदार पीसी मोहन यांनी दिशा रवीची तुलना थेट 26/11च्या हल्ल्यातील आरोपी अजमल कसाब आणि बुरहान वानीसोबत केली आहे. पीसी मोहन यांनी आपल्या ट्विटर अकाऊंटवरून याबाबत एक ट्विट केले आहे. बुरहान वानीदेखील 21 वर्षाचा होता. अजमल कसाबही 21 वर्षाचा होता. वय ही फक्त एक संख्या आहे. कोणीही कायद्यापेक्षा वरचढ नाही. कायद्याला आपले काम करू द्या. गुन्हा हा नेहमी गुन्हाच असतो, असे मोहन यांनी म्हटले आहे. तसेच आपल्या या ट्वीटमध्ये त्यांनी #DishaRavi असे देखील लिहिले असून दिशा रविचा एक फोटोही ट्वीट केला आहे. भाजपा नेत्याच्या या ट्विटची सध्या जोरदार चर्चा रंगली आहे.

> एका निशस्त्र तरुणीला बंदुकीवाले घाबरत आहेत.
> डरते हैं बंदूकों वाले एक निहत्थी लड़की से, फैले हैं हिम्मत के उजाले एक निहत्थी लड़की से...
>
> – प्रियांका गांधी, काँग्रेस महासचिव

> ते (मोदी सरकार) घाबरले आहेत, पण देश घाबरलेला नाही. भारत गप्प बसणार नाही.
>
> – राहुल गांधी, काँग्रेस नेते

> जर 22 वर्षांची विद्यार्थिनी देशासाठी धोका ठरत असेल तर भारताचा पाया नक्कीच डळमळीत झाला आहे. भारत एक मूर्खपणाची रंगभूमी बनत आहे आणि दिल्ली पोलिस अत्याचाऱ्यांचे साधन बनले आहेत, ही खेदाची बाब आहे.
>
> – पी. चिदंबरम, काँग्रेस ज्येष्ठ नेते

> कार्यकर्ते तुरुंगात बंद आहेत तर दहशतवादाचा आरोप असलेले जामिनावर बाहेर... आमचे अधिकारी पुलवामा हल्ल्याची आठवण कशी काढतील याचा विचार करताय?. खालच्या दोन शीर्षकांमध्ये उत्तर मिळेल.
>
> – शशी थरूर, काँग्रेसचे नेते

> 21 वर्षाच्या दिशाची अटक हा लोकशाहीवर हल्ला आहे. आपल्या शेतकऱ्यांचे समर्थन करणे कोणताही अपराध नाही.
>
> – अरविंद केजरीवाल, दिल्ली मुख्यमंत्री

तीन दिवसात करणार 3 मर्डर

नवराष्ट्र न्यूज नेटवर्क

दिल्ली. उत्तर प्रदेशमधील बस्ती जिल्ह्यातील कप्तानगंज पोलिस ठाण्यातील निलंबित हवालदाराने तीन दिवसांत तीन खून करण्याची खुलेआम धमकी दिली आणि तसेच गोरखपूर पोलिसांसह उत्तर प्रदेश पोलिसांना देखील आव्हान दिले की, दम असेल तर मला पकडून दाखवा. या हवालदाराने यूपी पोलिसांसाठी आक्षेपार्ह शब्ददेखील वापरले आहेत. एवढेच नव्हे तर तो स्वतःला हवालदार देखील म्हणत आहेत पण त्याला यूपीच्या डीजीपीचे नावदेखील माहीत नाही. सध्या बस्ती, गोरखपूरच्या पोलिसांसह कुशीनगरचे पोलिसही हवालदाराच्या शोधात गुंतले आहेत. निलंबित हवालदार दिग्विजय रायने सोशल मीडियावर धमकी देत म्हटले की, मी गोरखपूर पोलिस, गोरखपूर एसपी आणि उत्तर प्रदेश पोलिसांना आव्हान देत आहे.

पाक मंत्र्याने तोडले अकलेचे तारे

चाचणीसाठी वापरला अश्रूधुर

वृत्तसंस्था

इस्लामाबाद. नेहमीच आपल्या चमत्कारीक वक्तव्यासाठी प्रसिद्ध असलेल्या शेख रशीद अहमद या पाकिस्तानच्या गृहमंत्र्यांची जीभ पुन्हा एकदा घसरली. वेतनवाढीसाठी पाकिस्तान सरकार विरोधात निदर्शन करण्या यांवर पाकिस्तान पोलिसांनी अश्रूधुराचा वापर केला होता, या संदर्भात मत मांडताना रशीद म्हणाले की, अश्रूधुराचे गोळे बरेच दिवस पडून होते त्यामुळे चाचणी करण्यासाठी त्यांचा वापर करणे गरजेचे होते. पाकिस्तान पोलिसांनी 10 फेब्रुवारी रोजी वेतन आणि पेंशन वाढीसाठी निदर्शन करण्या या सरकारी कर्मचा यांवर अश्रूधुराचा वापर केला होता. रावळपिंडी येथील एका सभेत बोलताना रशीद यांनीं आपले मत मांडले होते. सोशल मीडियावर ब याच लोकांनी त्यांच्या या वक्तव्याबद्दल निषेध नोंदविला आहे आणि त्यांनी जाहीरपणे लोकांची क्षमा मागावी अशी मागणी केली आहे. त्या निदर्शनासाठी जवळजवळ दोन हजार लोकांनी एकत्र जमून संसद भवनावर मोर्चा नेण्याची योजना आखली होती.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात सविस्तर वर्णन केलेले मौजे रूई, ता. बारामती, जि. पुणे येथील गट नं.१/प्लॉट नं. ४४, क्षेत्र ५.००.१५ आर. चौ. मी. एन. ए. प्लॉट (यास पुढे 'सदर प्लॉट' असे संबोधिले आहे) सदर विद्यमान मालक १) श्री. संदीप कृष्णराव बांदल,२) लता पोपट पवार व ३) दत्तात्रय रामभाऊ आवाळे यांचे स्वतःचे स्वकष्टार्जित समाईक खरेदी मालकीचा असून सदर प्लॉट त्यांचेच ताबे कब्जेवहिवाटीस आहे असे सांगून सदर प्लॉट निर्वेध, निजोखमी व बोजारहीत आहे अशी खात्री देवून सदर प्लॉट निर्वेध, निजोखमी व बोजारहीत आहे अशी खात्री देवून सदर प्लॉट आमचे अशिलास कायम व खुष खरेदी देणेबाबत बोलणी करून व व्यवहार ठरलेला आहे. सबब, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या सदर प्लॉटवर कोणाचाही गहाण, दान, लिज, लीन, जप्ती, पोटगी भाडेकरू हक्क, ताबा साठेखत, बिगर ताबा साठेखत, खरेदीखत करार, वहिवाट, इजमेंट अगर हक्क, वारसा हक्क, दावा अगर मुखत्यार वा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून १० दिवसांचे आत आमची कागदोपत्रानिशी लेखी खात्री करून द्यावी. या मुदतीत कोणाचीही तक्रार अगर हरकत न आलेस त्यानंतर परिशिष्टात वर्णन केलेला सदर प्लॉट हा निजोखमी व बोजारहीत आहे असे समजून तसेच अन्य कोणाचाही हक्क, हितसंबंध असल्यास अगर उपस्थित झालेस ते जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे असे समजुन आमचे अशील खालील परिशिष्टात नमूद केलेल्या सदर प्लॉटचा खरेदीचा व्यवहार ठरलेप्रमाणे पूर्ण करतील याची नोंद घ्यावी मग त्याबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचे नुकसान होवून नये म्हणून खरेदीचा व्यवहार पूर्ण होण्याअगोदर प्रस्तुतची जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे.

परिशिष्ट - तुकडी पुणे, पोट तुकडी ता. बारामती, मे. दुय्यम निबंधक सो. बारामती यांच्या हद्दीतील तसेच बारामती नगरपरिषदेच्या वाढीव हद्दीतील गांव मौजे रूई, ता. बारामती, जि. पुणे येथील गट नं. १/प्लॉट नं. ४४, क्षेत्र ५.००.१५ आर. चौ.मी., बिगरशेती आकार ३७६ रू.११ पै. हा बिगरशेती प्लॉट यांसी चतुःसिमा खालीलप्रमाणे.
पूर्वेस - प्लॉट नं. ४३ **दक्षिणेस** - रूई-सावळ रस्ता
पश्चिमेस- प्लॉट नं. ४५ **उत्तरेस** - प्लॉट नं. ३९ व ४०
येणेप्रमाणे चतुः सिमापूर्वक बिगरशेती (एन.ओ.) प्लॉट त्यामधील दगड, माती, झाड, झुडूप, जल, तरू, तृण, काष्ठ, पाषाण इत्यादी तदंगभूत वस्तूंच्या व रस्ता वापर वहिवाटीचे अधिकारासह मिळकत ही या जाहीर नोटीसीचा विषय असे.
येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

सही
ॲड. धनंजय आप्पासो. ढोले
मु. पो. लाकडी, इंदापूर, जि. पुणे.
मोबाईल - ९९७००८०७७२

जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टांत वर्णन केलेली सदर मिळकत ही तिचे विद्यमान मालक **कोमल सागर काळभोर** यांचे मालकी वहिवाटीची असुन त्यांनी आमचे अशिल यांचे बरोबर खरेदीची बोलणी करून त्या अनुषंगाने विसार स्विकारून विसारपावती करून दिलेली आहे व खरेदीखत करून देणार आहेत. सदर मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिलांना सदर मिळकत ही पुर्णपणे निर्वेध व निजोखमी व बोजारहित असल्याची व त्यांना पुर्ण मार्केटेबल टायटल असल्याची खात्री व भरवसा दिलेला आहे. तसेच सदर मिळकत ही कोणत्याही शासकीय अगर निमशासकीय खात्याअंतर्गत संपादित केलेली नाही तसेच सदर मिळकतीवर वारसांबाबत कोणताही वाद नाही असा भरवसा दिलेला आहे. सदर मिळकतीमध्ये मालकांचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, बोजा अथवा कोर्ट केस नाही अशी खात्री व भरवसा आमचे अशिलांना दिलेला आहे. तरी देखील सदर मिळकतीमध्ये विद्यमान मालकांचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, बोजा अथवा कोर्ट केस अथवा स्थगिती आदेश असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झालेपासुन ७ (सात) दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे मुळ कागदोपत्री व लेखी पुराव्यानिशी आमची खात्री पटवून द्यावी, अन्यथा आमचे अशिल सदर मिळकत विद्यमान मालकांबरोबर पुढील योग्य ते व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत, तक्रार मान्य करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट - तुकडी, पुणे पोट तुकडी तालुका दौंड जिल्हा व जिल्हा परिषद पुणे यांचे हद्दीतील तसेच तालुका पंचायत समिती दौंड यांचे हद्दीतील तसेच मे. दुय्यम निबंधक साहेब केडगांव/दौंड यांचे हद्दीतील, गांव व ग्रामपंचायत मौजे यवत, ता. दौंड, जि. पुणे येथील गट नं. ६४५ यांसी क्षेत्र - ०१ हे. ०२ आर + पो.ख. ० हे. ३४ आर एकूण १ हे. ३६ आर यांसी आकार ०० रू. १९ पै. सदर गटापैकी कोमल सागर काळभोर यांचे मालकी वहिवाटीचे क्षेत्रापैकी ० हे. ४० आर क्षेत्र यांसी चतुःसिमा
पूर्वेस :- गट नं. ६४५ पैकी
उर्वरित क्षेत्र, **दक्षिणेस** :- गट नं. ६२० **पश्चिमेस** :- गट नं. ६४४, **उत्तरेस** :- गट नं. ६८१
येणेप्रमाणे चतुःसिमापूर्वक **० हे. ४०** आर क्षेत्र त्यातील दगड, माती, धोंडा, तण, तृण, इत्यादीसह व सर्व इजमेंटच्या हक्कासहित दरोबस्त, काही एक हक्क वा अधिकार राखून न ठेवता याची रस्ता वहिवाट करणेचे हक्कासह हा या जाहिर नोटीसीचा विषय असे.
येणेप्रमाणे जाहिर नोटीस दिली असे.
ठिकाण :- बारामती दिनांक :- १५/०२/२०२१

सही
ॲड. अजिनाथ नवनाथ साखरे
ऑफिस नं. ४६, संघवी हाईटस्,
भिगवण रोड, बारामती, जि. पुणे
मोबाईल - ९३२६०८३००७

...तर बीपीएल कार्ड होणार रद्द

नवराष्ट्र न्यूज नेटवर्क

बेळगाव. कर्नाटक राज्यात ज्यांच्याकडे टीव्ही फ्रीज आणि दुचाकी असेल, त्यांचे बीपीएल कार्ड रद्द करण्यात येणार असल्याची घोषणा अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक व्यवहार मंत्री उमेश कट्टी यांनी केली. बेकायदेशीरबीपीएल रेशनकार्ड रद्द करण्यासाठी काही कालवधी लागतो. मात्र, बीपीएल कार्ड कोणाकडे असावे, ते देखील प्रमाणित आहे. व्यक्तींकडे पाच एकरपेक्षा जास्त जमीन, दुचाकी, टीव्ही आणि फ्रीज नसावेत. जो कोणी या सर्व निकषांची पूर्तता करत नाही त्याला बीपीएल कार्ड परत करावे लागेल, असे त्यांनी सांगितले. सरकारी, अशासकीय अधिकारी व्यतिरिक्त 1 लाख 25 हजार रुपये उत्पन्न असलेल्या लोकांना बीपीएल कार्ड परत करावे लागेल. यासाठी 31 मार्चपर्यंत मुदत देण्यात आली आहे, असे कट्टी यांनी सांगितले. गरीबी रेषेखाली जगणाऱ्या लोकांना बीपीएल रेशन कार्ड मिळते. दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना शासन आर्थिक मदत पुरवते. जेणेकरून ते सहजपणे आपल्या कुटुंबाचे पालनपोषण करू शकतील. ज्याचे उत्पन्न दरमहा पंधरा हजार रुपयांपेक्षा कमी आहे.

बिप्लब देव यांचे पुन्हा वादग्रस्त विधान

शाहांना नेपाळ, श्रीलंकेतही करायचाय भाजपचा विस्तार

नवराष्ट्र न्यूज नेटवर्क



आगरतळा. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना नेपाळ आणि श्रीलंकेसारख्या शेजारी देशांमध्ये भारतीय जनता पक्षाचा विस्तार करायचा आहे, असे वादग्रस्त वक्तव्य त्रिपुराचे मुख्यमंत्री बिप्लब देब यांनी केले. त्रिपुराची राजधानी आगरतळामध्ये भाजप कार्यकर्त्यांना संबोधित करताना बिप्लब देब यांनी शाहांचा मनोदय व्यक्त केला. भाजपला भारताच्या सीमा विस्तारून विचार करायला हवा, असे अमित शाह यांनी त्रिपुरा दौऱ्यात सांगितल्याचे देब यांनी कार्यकर्त्यांना सांगितले. रवींद्र सतबर्षिकी भवनात बिप्लब देब यांनी कार्यकर्त्यांना संबोधित केले. अमित शाह यांचे नेतृत्व आणि भारताच्या सीमा उल्लंघून भाजपचा विस्तार करण्याच्या दृष्टिकोनाला देब यांनी दाद दिली.

जगातील सर्वांतमोठा पक्ष

जेव्हा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह भाजपचे अध्यक्ष होते, तेव्हा ते त्रिपुरा राज्याच्या दौऱ्यावर आले होते. आमची एका गेस्ट हाऊसमध्ये भेट झाली. आम्ही गप्पा मारत होते. तेव्हा भाजपचे उत्तर-पूर्व झोनल सचिव अजय जमवालही होते. भाजपने अनेक राज्यांमध्ये सरकार स्थापन केल्याचे जमवाल म्हणाले. तेव्हा अमित शाह म्हणाल होते, की अजून श्रीलंका आणि नेपाळ बाकी आहेत. आपल्याला शेजारी देशांमध्येही पक्षाचा विस्तार करायचा आहे. तिथेही विजय मिळवायचा आहे, असे मुख्यमंत्री बिप्लब देब भाजप कार्यकर्त्यांना सांगत होते. ज्यांच्याकडे इतकी ऊर्जा आहे, असा दृष्टिकोन आहे, ते बोलत आहेत की भाजपला जगभरात विस्तार करण्याची आवश्यकता आहे. त्यांच्या नेतृत्वात भाजप जगातील सर्वांत मोठा पक्ष झाला आहे. असा विक्रम फक्त कम्युनिस्टांनी नोंदवला आहे, असेही बिप्लब देब म्हणाले.

कन्हैयाने घेतली जेडीयू नेत्याची भेट

पाटणा. बिहारच्या राजकारण रोज नवनवीन काही समोर येत आहे. सध्या चर्चा आहे ती, कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडियाचे (सीपीआय) नेते व जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे (जेएनयु) माज अध्यक्ष कन्हैया कुमार यांनी बिहार सरकारमधील मंत्री व जनता दल युनायटेड (जेडीयु) नेता अशोक चौधरी यांची भेट घेतली. कन्हैया व अशोक चौधरी यांच्यात अनेक मुद्यांवर चर्चा झाली. कन्हैया कुमार यांनी अशोक चौधरी यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतली. सध्यातरी ही भेट औपचारिक असल्याचे सांगण्यात येत असले तरी दुसरीकडे राजकीय वर्तुळात हालचालींना वेग आला आहे. सीपीआयने कन्हैया कुमार यांच्याविरोधात निषेध प्रस्ताव पारित केल्यानंतर ही भेट होत आहे.

दौंड नगरपरिषद, दौंड जि. पुणे.

जाहीर प्रसिध्दी

याद्वारे अधिकृत काम करणारे ठेकेदार यांना कळविण्यात येते की, दौंड नगरपरिषद विद्युत विभागाकडील खालील तपशिलातील अ. क्र. १ मधील काम करावयाचे असून, त्याकरिता सीलबंद दरपत्रक मागविण्यात येत आहे. उपरोक्त काम करणारे ठेकेदार यांनी दि. २३/०२/२०२१ रोजी दुपारी ४.३० वाजेपर्यंत मा. मुख्याधिकारी साहेब यांच्याकडे सीलबंद दरपत्रक स्वीकारले जातील. तसेच खालील तपशिलातील अ.क्र. २ मधील कामाचे साहित्य पुरवठ्यासह काम करावयाचे असून, त्याकरिता सीलबंद निविदा दि.१८/०२/२०२१ रोजी दुपारी ४.३० वाजेपर्यंत मा. मुख्याधिकारी साहेब यांच्याकडे स्वीकारल्या जातील. विहित मुदतीत प्राप्त झालेल्या सर्व निविदा शक्य झाल्यास त्याच दिवशी सायंकाळी ५.०० वाजता उपस्थित निविदाधारकांसमोर मुख्याधिकारी यांचे दालनामध्ये उघडण्यात येतील. अ.क्र. ३ साठी विहित नमुन्यातील कोऱ्या निविदा फॉर्म नगरपरिषद कार्यालयात दि. १८/०२/२०२१ रोजी दुपारी ४.३० वाजेपर्यंत सुट्टीचे दिवसाखेरीज कार्यालयात कार्यालयीन वेळेत मिळतील. सोबत इकडील शर्ती व अटी मान्य असल्याचे निवेदन तसेच आवश्यक बयाणा रक्कम भरल्याची पावती सादर करणे आवश्यक आहे. सर्व निविदांपैकी एक निविदा मंजुर अथवा सर्व निविदा नामंजुर करण्याचा अधिकार राखून ठेवण्यात आला असून, त्याबाबत कोणतीही करणे दिली जाणार नाही.

क्र.	कामाची मुदत	निविदा फॉर्म फी	बयाणा रक्कम	कामाची मुदत
१	दौंड नगरपरिषद विद्युत विभागाकरीता व्हेईकल माऊंटेड हायड्रॉलिक लॅडर दरपत्रक देणे.	---	---	---
२	दौंड नगरपरिषद हद्दीतील पथदिवे दुरुस्ती करणे करीता आवश्यक असणारे साहित्य पुरवठा करणे. (क्लॅम्प, ब्रेकेट इ.) (फेरनिविदा)	१००/-	३०००/-	वार्षिक
३	दौंड नगरपरिषद हद्दीतील झाडांवर माहिती फलक लावणे.	---	५००/-	३० दिवस

दौंड नगरपरिषद,
दौंड जावक क्र. दौनप/ ३६८७/२१
दिनांक १५/०२ /२०२१.

सही

(मा. सौ. शीतल कटारिया)
नगराध्यक्ष
दौंड नगरपरिषद, दौंड

(मा. विलास शितोळे)
उपनगराध्यक्ष
दौंड नगरपरिषद,दौंड

(मा. निर्मला राशिनकर),
मुख्याधिकारी
दौंड नगरपरिषद, दौंड

अण्णाद्रमुककडून नेहमीच आश्वासनपूर्ती

वृत्तसंस्था

कोइंबतूर. तामिळनाडूचे मुख्यमंत्री के. पलानीस्वामी यांनी सोमवारी सांगितले की, सत्ताधारी अण्णाद्रमुकने निवडणूक जाहीरनाम्यात दिलेली आश्वासने पूर्ण केली आहेत तर विरोधी पक्ष द्रमुकने कधीही दिलेली आश्वासने पूर्ण केली नाहीत. ते म्हणाले, डीएमकेने 2006 मध्ये जाहीरनाम्यात गरीब कुटुंबांना दोन एकर जमीन देण्याचे आश्वासन दिले होते, जे कधीच पूर्ण झाले नाही. दुसरीकडे एआयएडीएमकेने संस्थापक आणि दिवंगत मुख्यमंत्री एमजी रामचंद्रन यांच्या काळापासून सर्व आश्वासने पूर्ण केली असल्याचा दावा पलानीस्वामी यांनी केला. महिलांच्या कल्याणकारी योजनांना अधोरेखित करताना ते म्हणाले की, अण्णाद्रमुक सरकारने लग्नात मदत म्हणून गेल्या 10 वर्षात 4200 कोटींपेक्षा जास्त रुपये वितरित केले. याचा फायदा सुमारे 11. 8 लाख महिलांना झाला. पलानीस्वामी म्हणाले की, 'थलिकु थांगम' (मंगळसूत्र सोने) योजनेंतर्गत 1796 कोटी रुपयांच्या 6086 किलो सोन्याचे वितरण करण्यात आले. तसेच अम्मा दुचाकी वाहन योजनेंतर्गत सरकारने वाहने खरेदीसाठी 2.98 लाख महिलांना 731कोटी रुपयांचे अनुदान दिले. उपमुख्यमंत्री ओ पन्नेरसेल्वम म्हणाले की, केंद्राकडून तामिळनाडूसाठी अनेक विकास प्रकल्प मिळविण्यात यश मिळाले आहे. तामिळनाडूकडून दहा लाख कोटी रुपयांच्या कर संकलनासह केंद्रात संयुक्त कार्यकाळात द्रमुकचा प्रमुख भागीदार राज्याचा विकास प्रकल्प मिळविण्यात अपयशी ठरला.

Fullerton Grihashakti
Iraada hai toh Raasta hai

फुलर्टन इंडिया होम फायनान्स कंपनी लिमिटेड

कॉर्पोरेट कार्यालय : ५ वा व ६ वा मजला, बी विंग, सुप्रीम आयटी पार्क, सुप्रीम सिटी, पवई, मुंबई – ४०० ०७६.
नोंदणीकृत कार्यालय : मेघ टॉवर्स, ३ रा मजला, जुना क्र. ३०७, नवीन क्र. १६५, पूनमल्ली हाय रोड, मदुरावोयाल, चेन्नई – ६०० ०९५.

स्थावर मालमत्तांच्या विक्रीकरिता विक्री सूचना

सीक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचन सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ (६) व ९ (१) च्या तरतुदीअंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई – लिलाव विक्री सूचना

तमाम जनतेस व विशेषत: कर्जदार व हमीदारांना याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, प्रतिभूत धनकोंकडे गहाण/प्रभारित खालील निर्देशित स्थावर मालमत्ता (प्रतिभूत संपत्ती) ज्यांचा ताबा फुलर्टन इंडिया होम फायनान्स कंपनी लिमिटेड (प्रतिभूत धनको) यांच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे घेण्यात आला होता, त्या मालमत्तेची फुलर्टन इंडिया होम फायनान्स कंपनी लिमिटेड (प्रतिभूत धनको) यांना कर्जदार व हमीदारांकडून खालील निर्देशित केल्यानुसार देय असलेली खालील निर्देशित थकित रक्कम व त्यावरील वसुलीच्या तारखेपर्यंत पुढील व्याज व अन्य खर्च या रकमेच्या वसुलीसाठी **जशी आहे जेथे आहे, जशी आहे जी आहे व जी काही आहे तेथे आहे** तत्त्वावर विक्री करण्यात येत आहे. राखीव मूल्य, इसारा रक्कम ठेव (इरठे) व इरठे जमा करण्याची अंतिम तारीख खालीलप्रमाणे आहे :

१. ई– लिलाव दिनांक व वेळ : दि. ०९.०३.२०२१ रोजी स. ११.०० वा. ते दु. १.०० वा. (प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारांसह)
२. सहभागाकरिताचे विनंती पत्र/केवायसी दस्तावेज/इरठेचा पुरावा यांच्या सादरीकरणाची अंतिम तारीख व वेळ : दि. ०८.०३.२०२१.

कर्जदार/हमीदाराचे नाव/कर्ज खाते क्रमांक	मागणी सूचना दिनांक व रक्कम	गहाण स्थावर मालमत्तेचे विवरण
कर्ज खाते क्रमांक : ६०१९०७५१०१९६८७९ **१. फझल बशीर जमाल, २) हमीदा फझल जमाल,** **३) मे. लिविंग वॉटर्स हॉस्पिटॅलिटी प्रा. लि. (संचालक – फझल बशीर जमाल)** **पत्ता १** : फ्लॅट क्र. ५०१, सी–विंग, ५ वा मजला, व्हिक्टोरिया गार्डन को–ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि., सर्व्हे क्र. २१८ए, कल्याणी नगर, येरवडा, ऑफ नगर पुणे रोड, पुणे – ४११००६, **पत्ता २** : फ्लॅट क्र. ०२, तळमजला, सी बिल्डिंग, अशोका ट्रिप्लेक्स काँडोमिनियम अपार्टमेंट, सब प्लॉट क्र. ३०, रोड क्र. ०८, कल्याणी नगर, येरवडा, पुणे – ४११००६, **पत्ता ३** : सर्व्हे क्र. २०७/१, लँडमार्क गार्डन, पीएल–७८, कल्याणी नगर, येरवडा, पुणे – ४११००६.	**दिनांक :** **०२.०८.२०१९, रु. २,२५,९३,०७२.८२/** – (रु. दोन करोड पंचवीस लाख त्र्याणव हजार बहात्तर व ब्याऐंशी पैसे मात्र)	फ्लॅट क्र. ०२, तळमजला, सी बिल्डिंग, अशोका ट्रिप्लेक्स काँडोमिनियम अपार्टमेंट, सब प्लॉट क्र. ३०, अंतिम प्लॉट क्र. ७७ (किंवा ३५ए), सर्व्हे क्र. २०९/४, सीटीएस क्र. २१०९, रोड क्र. ०८, कल्याणी नगर, येरवडा, पुणे – ४११००६.

राखीव मूल्य : रु. १,१७,००,०००/– (रु. एक करोड सतरा लाख मात्र)
इसारा रक्कम ठेव : रु. ११,७०,०००/– (रु. अकरा लाख सत्तर हजार मात्र)
बोली विस्तार मूल्य : रु. १,१७,०००/– (रु. एक लाख सतरा हजार मात्र)

विक्रीच्या विस्तृत अटी व शर्ती खालील निर्देशित आहेत व त्यांचा तपशील आमची/प्रतिभूत धनकोंची खालील निर्देशित लिंक/वेबसाइट पत्त्यावरही दिलेला आहे : **(https://disposalhub.com वा https//www.girhashakti.com/pdf/E-Auction.pdf)** तसेच प्रस्तावित बोलीदार पुढील क्रमांकावर संपर्क करु शकतील :– **१) श्री. अशोककुमार मांडे – मोबा. क्र. ९८९२२९४८४१, २) श्री. दीपक गुप्ता – मोबा क्र. ९३२१४५०७२३.** सही/–

ठिकाण : पुणे
दिनांक : १५.०२.२०२१

प्राधिकृत अधिकारी
फुलर्टन इंडिया होम फायनान्स कंपनी लिमिटेड

SICOM LIMITED

नोंदणीकृत कार्यालय : सिकॉम लि., सॉलिटेअर कॉर्पोरेट पार्क, इमारत क्र. ४, ६ वा मजला, गुरू हरगोविंदजी मार्ग, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई–४०० ०९३
दूर. : ०२२–६६५७ २७०० **वेबसाइट** : www.sicomindia.com

जाहीर लिलाव सूचना

सिकॉम लिमिटेडद्वारे संपूर्ण प्रभार असलेल्या सिकॉम लिमिटेडकडे गहाण असलेल्या खालील निर्देशित मालमत्तांच्या दी स्टेट फायनान्शिअल कॉर्पोरेशन ॲक्ट, १९५१ (एसएफसी ॲक्ट) च्या सेक्शन २९ (१) च्या तरतुदीअंतर्गत मे. कलानी इंडस्ट्रीज लि. (कर्जदार) यांच्याकडून सिकॉम थकबाकीच्या वसुलीसाठी मुंबई येथील सिकॉमच्या नोंदणीकृत कार्यालयात दि. ०५.०३.२०२१ रोजी दु. ३.०० वाजता जाहीर लिलावाद्वारे **जशी आहे जेथे आहे, जशी आहे जी आहे, जी काही आहे तेथे आहे व विना अडथळा तत्त्वावर** तसेच कोणतीही वॉरन्टी व क्षतिपूर्ततेविना विक्रीकरिता इच्छुक पार्टीजकडून प्रस्ताव/बोली मागविण्यात येत आहेत.
विक्री ही स्विस चॅलेंज पद्धतीअंतर्गत हातात तयार प्रस्ताव असलेल्यांकरिता असेल, ज्यांना प्रथम नकाराच्या त्यांच्या हक्काअंतर्गत सर्वोच्च बोलीइतकी बोली सादर करण्याचा अधिकार असेल. मालमत्ता खरेदी करू इच्छिणाऱ्या कोणत्याही अन्य खरेदीदारांना मूळ प्रस्तावदाराद्वारे दिलेल्या रकमेइतकी सर्वोच्च बोली सादर करावी लागेल व मूळ प्रस्तावदाराकडून मालमत्तेच्या मूल्याइतकी रक्कम सादर करता न आल्यास जाहीर लिलावादरम्यान अशा बोलीदारांना सर्वोच्च बोली प्रस्ताव देण्यात येईल.

कर्जदाराचे नाव	मालमत्तेचे विवरण	राखीव मूल्य	इसारा रक्कम ठेव	परीक्षणाची तारीख व वेळ	लिलावाची तारीख व वेळ
मे. कलानी इंडस्ट्रीज लि.	पुढील विवरणीत जमिनीवरील सर्वंकष संपूर्ण प्रभार – जमीन मोजमापित ६४ आर, १.६५ एमडब्ल्यू (व्हेस्टास मेक) च्या १ डब्ल्यूईजीसह, गट क्र २२२, गाव गुडे पांचगणी, तालुका शिराळा, जिल्हा सांगली, महाराष्ट्र येथील.	रु. ९१.०० लाख	रु. ९.१० लाख	दि. २६.०२.२०२१ रोजी स. ११.०० ते दु. ४.००	दि. १७.०३.२०२१ रोजी दु. ३.०० वा., सिकॉमच्या मुंबई येथील कार्यालयात.

लिलावाच्या अटी व शर्ती :

१. लिलावात सहभागासाठी इच्छुक बोलीदार/प्रस्तावदारांना **सिकॉम लिमिटेडच्या** नावे मुंबईत देय शेड्युल्ड बँकेचा धनाकर्ष/पे ऑर्डर स्वरूपातून **रु. ९.१० लाखांच्या इसारा रक्कम ठेवीचे (इरठे)** प्रदान करावे लागेल. इरठेशिवाय असलेले प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत तसेच अटी व शर्तींची स्वाक्षरीत प्रत व आवश्यक इरठेशिवाय आलेले किंवा वरील विहित तारखेपश्चात प्राप्त प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत /वैध निविदा म्हणून विचारात घेतले जाणार नाहीत व रद्द करण्यात येतील.
२. लिलाव विक्री ही स्विस चॅलेंज पद्धतीच्या **अटी व शर्तीअंतर्गत तसेच वरील मालमत्तेच्या विक्रीच्या सर्वसाधारण अटी व शर्तींच्या अधीन असतील**, ज्याकरिताच्या वेगळ्या प्रती बोलीदारांना सिकॉम लिमिटेडच्या नोंदणीकृत कार्यालयातून किंवा सिकॉम च्या अधिकृत वेबसाइटवरून (www.sicomindia.com) प्राप्त करता येऊ शकतील. बोलीदारांना स्विस चॅलेंज पद्धतीच्या अटी व शर्ती तसेच विक्रीच्या सर्वसाधारण अटी व शर्ती प्राप्त झालेल्या नसल्या तरीही त्या प्राप्त झालेल्या आहेत व तत्पश्चात त्यांचे परीक्षण करण्यात येऊन त्या स्वीकारण्यात आल्या आहेत असे समजण्यात येईल.
३. **प्रस्ताव सादरीकरणाची अंतिम तारीख व वेळ : दि. १७.०३.२०२१ रोजी दु. १.०० वाजेपर्यंत सिकॉमचे नोंदणीकृत कार्यालय, मुंबई येथे.**
४. **मालमत्तेचा जाहीर लिलाव सिकॉमचे नोंदणीकृत कार्यालय, मुंबई येथे दि. १७.०३.२०२१ रोजी दु. ३.०० वाजता आयोजित करण्यात येईल.**
५. कोणतेही कारण न देता बोली स्वीकारणे वा रद्द करणे किंवा जाहीर लिलाव रद्द करणे/तहकूब करण्याचा अधिकार सिकॉमकडे राखून आहे.
६. सिकॉम लि.च्या सर्वोत्तम माहिती व ज्ञानानुसार मालमत्तांवर सध्या कोणतेही भार नाहीत. पुढे लिलाव सूचनेत विहित केलेले विवरण व मोजमाप हे सिकॉमच्या सर्वोत्तम माहिती व ज्ञानानुसार आहे व त्यातील कोणत्याही प्रकारची त्रुटी, चुकीचे विवरण, भार, मजकूर वगळणे, वास्तविक विवरण व मोजमापातील बदलाकरिता सिकॉम जबाबदार नसतील. बोलीदारांनी स्वत:हून सर्व दृष्टीने यामध्ये कोणतेही प्रभार, धारणाधिकार, कर वा अन्य थकबाकी यांचा समावेश परंतु तोपर्यंतच मर्यादित नाही, सर्व चौकशी करावी. बोलीदारांना सदर मालमत्ते संदर्भात स्वत:हून सर्व चौकशी करावी. विक्री करावयाच्या मालमत्तेसंदर्भात कोणतेही प्रभार, धारणाधिकार, भार, मालमत्ता कर वा अन्य कोणत्याही थकबाकीकरिता सिकॉम लि. जबाबदार नसेल. सर्व वैधानिक दायित्वे/ कर/ देखभाल, शुल्क/ विजेचे/ पाणी प्रभार, ग्रामपंचायत व मनपा प्रभार आदी जे सदर तारखेस थकित असतील व अजूनही भरणा केलेले नसतील त्याचे प्रदान बोलीदारांना करावे लागेल व यशस्वी बोलीदार/खरेदीदारांना त्याचे प्रदान करावे लागेल. गहाण मालमत्तेवरील कोणत्याही स्वरूपातील कोणत्याही प्रकारची माहिती देण्याची किंवा त्यांचे प्रदान करण्याची जबाबदारी सिकॉम लि. घेत नाही.
७. आयकर कायद्याच्या कलम १९४ आयए अंतर्गत आयकर म्हणून विक्री मूल्याच्या १% (एक टक्का) इतके शुल्क देण्याची जबाबदारी खरेदीदार/यशस्वी बोलीदाराची असेल. खरेदीदार/यशस्वी बोलीदाराद्वारे सिकॉमला देण्यात आलेल्या मूल्याच्या व्यतिरिक्त सदर रक्कम खरेदीदार/यशस्वी बोलीदारास प्रदान करावी लागेल व त्यासंदर्भात कोणत्याही प्रकारच्या वजावटीच्या अधीन नसताना सिकॉमचे प्रस्ताव/बोली शुल्क असेल.

पुढील तपशील तसेच विक्रीच्या अटी व शर्तींकरिता कृपया संपर्क साधा :

श्री. राजेंद्र भोसले,	दूर.०२२–६६५७२७२४, मोबाइल ९८३३५४६३४९	ई–मेल : rbhosale@sicomindia.com
श्रीमती रसिका सावंत,	दूर.०२२–६६५७२७५०, मोबाइल ९८५०९६३२९९	ई–मेल : rsawant@sicomindia.com

दिनांक : १६.०२.२०२१
ठिकाण : मुंबई

सही/–
सिकॉम लिमिटेड